# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/12/2022 (शुक्रवार) सकाळ

### घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मकरधोकडा येथे दिनांक १४/१२/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक १५/१२/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रवी गंगाराम उईके, वय ३८ वर्ष, रा. मकरधोकडा वार्ड क्र. ०५ ता. उमरेड हे आपल्या पत्नी व मुलासह सीर्सीला गेले होते व त्यांचा मोठा मुलगा शेजारील घरी झोपायला गेला होता. फिर्यादीच्या मोठया मुलाने दिनांक १५/१२/२०२२ चे सकाळी फोन करून सांगीतले की घराचे दाराचे कुलुप तुटलेले आहे फिर्यादीने येवुन पाहीले असता कुलुप तुटलेले दिसले. दिवान व कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटावरील सुटकेसमधील कागदपत्रे पडलेले होते. सुटकेसमध्ये ठेवलेली जुनी वापरती सोन्याची ५.५ ग्रॅमची अंगठी किंमती अंदाजे १००००/– रू. तसेच नगदी ४,५००/– रू. असा एकुण १४,५००/– रूपयाचा मुद्देमाल फिर्यादीच्या राहते घराचे पुढच्या दरवाज्याचे कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून चोरी केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जोधे मो क्र ९८२३११५३७३ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत बी. एस. एन. एल कार्यालय वेलतुर येथे दिनांक १५/१२/२०२२ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रविंद्र महादेव धनविजय, वय ४३ वर्ष, रा. कुही हे कॉंट्रेक्ट बेसीकवर बी. एस. एन. एल कार्यालय येथे काम करत असुन त्यांचेकडे कुही तालुक्यातील चारही बी. एस. एन. एल कार्यालयातील दुरूस्तीचे काम आहे. मागील महीन्यापुर्वी मौजा वेलतुर येथील पुर्ण काम करून गेले तेव्हा कार्यालयाला लॉक केलेले नव्हते फक्त कडी लावलेली होती. नमुद घटनावेळी व ठिकाणी बॅक ऑफ महाराष्ट्र येथील लाईन बंद असल्यामुळे ती चेक करणेकरीता सौ. रश्मी वासवानी ज्युनिअर इंजिनिअर, सौ. मस्के ज्युनिअर टेलीकॉम इंजिनीअर सह आले असता वेलतुर येथील बि. एस. एन. एल. कार्यालय येथे गेले असता कडी उघडुन आतमध्ये जावुन पाहीले असता रॅकमधुन ०५ बॅटरी सेल खाली काढलेल्या होत्या व ०६ सेल त्या रॅकमध्ये दिसले परंतु त्यासोबत ठेवलेले १३ सेल दिसले नाही. त्या ठीकाणी शोधाशोध केली असता १३ बॅटरी सेल कुठेही आढळुन आले नाही. त्या ठिकाणी एक लोखंडी पाना दिसला त्यामुळे गेलेले १३ बॅटरी सेल अमर राजा कंपनीचे ४०० वॅटचें किंमती अंदाजे ६००००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतीश पाटील पोलीस स्टेशन वेलतुर मो. नं ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर